**कारखाने व आस्थापनांमध्ये खाजगी ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या खाजगी सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करण्याची पध्दती.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**शासन निर्णय क्रमांक : एसजीए-१५१०/प्र.क्र. २३९४/कामगार-५**
**दिनांक :- २५ ऑगस्ट, २०१०**

पहा :- १) शासन आदेश क्र.एसजीए-१५२००५/(२३२/६)/कामगार-५, दि.१९.६.२००६.
२) शासन निर्णय क्र.एसजीए-१५२००५/(२३२/६)/कामगार-५, दि.१९.६.२००६.
३) शासन आदेश क्र.एसजीए-१५२००९/प्र.क्र.१५८८/कामगार-५, दि.२.३.२००९.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रात कारखाने, कंपन्या, व्यापारी आस्थापना इत्यादी ठिकाणी खाजगी ठेकेदारामार्फत खाजगी सुरक्षा रक्षक म्हणून नोकरी करीत असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच सुरक्षा रक्षकांना त्यांच्या नोकरीचे नियमन करणे व त्यांच्या नोकरीच्या अटी व शर्ती व त्यांचे कल्याण यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबी यासाठी अधिक चांगल्या तरतुदी करणे, अशा सुरक्षा रक्षकांचा पुरठा योग्य प्रकारे व्हावा या उद्देशाने शासनामार्फत महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ३ मध्ये व त्याखालील योजना, २००२ (सुधारीत) या अंतर्गत तरतूद करण्यांत आली आहे. सन १९८१ पासून हा कायदा अंमलात आला असून त्यासाठी सदर योजनेची अंमलबजावणी आणि संनियंत्रण करण्यासाठी राज्यातील बृहन्मुंबई व ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर इत्यादि ठिकाणी सुरक्षा रक्षक मंडळांची निर्मिती करण्यांत आली आहे. असे असले तरी सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी पध्दतीत वेळोवेळी बदल होत असल्याने व ती सुटसुटीत नसल्यामुळे या सुरक्षा रक्षक मंडळाच्या कामाची तसेच अधिनियमांतर्गत तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकलेली नाही असे आढळून आले आहे. त्याबाबत असेही दिसून आले होते की, सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षक म्हणून नोंदणी करण्याबाबतचे या आधीचे वर पहा (१) येथे नमूद केलेले सुरक्षा रक्षकांचे नोंदणीचे आदेश विचारात घेतले तर सदर आदेशात पूर्णपणे पारदर्शकता दिसून येत नाही. तसेच सुरक्षा रक्षकाने ठेकेदारामार्फत काम केले असल्याने त्यास असलेला सुरक्षा रक्षकाच्या कामाचा अनुभव विचारात घेऊन अशा सुरक्षा रक्षकाच्या मंडळातील नोंदणीसाठी वयाची अट शिथील करण्यात आली होती. तथापि, खूप कमी दिवस काम केलेल्या आणि सुरक्षा रक्षकाच्या कामाचा काहीच अनुभव नसलेल्या सुरक्षा रक्षकांनीही मंडळातील नोंदणीचे वेळी वयाच्या अटीचा फायदा घेतल्याचे दिसून आले आहे. तथापि, आस्थापनेमध्ये किती दिवस काम केल्यानंतर व त्या सुरक्षा रक्षकास आस्थापनेने कामावरुन कमी केल्यानंतर जर त्याला मंडळात नोंदित व्हायचे असल्यास त्या सुरक्षा रक्षकाने किती दिवस आस्थापनेत काम करणे आवश्यक आहे याबाबत स्पष्टता नव्हती व अशा सुरक्षा रक्षकालाही नोंदणीचे फायदे पहा (१) मिळत होते, त्यामुळे योजनेच्या खंड १४ मधील तरतुदींची व त्या मागील उद्देशांची पूर्तता होत नसल्याचे दिसून आले आहे.

...२

वरील बाबींचा व इतर सर्व अनुषंगिक बाबींचा विचार करुन तसेच सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीबाबत मुंबई उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निदेश तसेच सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीमध्ये पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने शासनाने दि.१९.६.२००६ रोजीचा पहा (२) येथील शासन निर्णय अधिक्रमीत करुन दि.२.३.२००९ रोजीचा शासन आदेश निर्गमित केला आहे. तसेच सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्यासंदर्भात भविष्यात कुठल्याही प्रकारची अस्पष्टता राहू नये याकरितां मंडळाची सद्यःस्थितीत सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याची प्रचलित पध्दत बदलून त्याऐवजी नोंदणीची सुधारित पध्दत अवलंबण्याचे ठरविण्यात आले आहे. तथापि, दि.२.३.२००९ रोजीच्या शासन आदेशामध्ये सध्या आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्यासाठी वयाची सुट देण्यात आली नव्हती. तसेच कार्यरत सुरक्षा रक्षक किमान किती दिवस सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहे व सध्या काम करीत आहे याचाही उल्लेख करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे खंड १४ मधील तरतूदी लक्षात घेता व तसेच मुंबई उच्च न्यायालयाने नोंदणीबाबत वेळोवेळी दिलेले निदेश पाहता वरीलप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक वाटते. त्यामुळे जे सुरक्षा रक्षक सध्या कार्यरत आहेत व ज्यांची नोंदणी खंड १४ प्रमाणे करावयाची आहे त्यासाठी शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे. त्यास अनुसरुन पहा (१) मध्ये नमुद केलेला शासन आदेश अधिक्रमित करुन शासन आता खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ व त्याखालील योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सर्व सुरक्षा रक्षक मंडळांमार्फत सुरक्षा रक्षक मंडळात नोंदीत असलेल्या मुख्य मालकांच्या मागणीनुसार मंडळाने सुरक्षा रक्षक पुरविण्याची तरतूद आहे. त्यासाठी योजनेच्या खंड १४ अन्वये सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीबाबत केलेल्या तरतूदींची पूर्तता होण्याच्या दृष्टीने मंडळाने दि.२.३.२००९ रोजीच्या शासन आदेशान्वये विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन व त्यासाठी मंडळ स्तरावर सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीबाबतचे वेळापत्रक तयार करुन खाजगी सुरक्षा एजन्सीमार्फत आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या तसेच मंडळात नोंदीत होण्यास इच्छुक असलेल्या सुरक्षा रक्षकांनी सुरक्षा रक्षक मंडळात नोंदणीसाठी केलेले अर्ज स्वीकारुन तसेच स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन इच्छुक व पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन शासनाच्या दि.२.३.२००९ रोजीच्या शासन आदेशातील अटींच्या अधीन राहून सुरक्षा रक्षकांची नोंदणी प्रक्रिया एकत्रितपणे मंडळाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करावी. तथापि, सदर नोंदणी प्रक्रिया पार पाडताना एजन्सीमार्फत कार्यरत असलेल्या व मंडळात नोंदणी मिळण्याकरीता अर्ज केलेल्या इच्छुक सुरक्षा रक्षकाने किमान १८० दिवस मुख्य मालकाकडे काम करीत असल्याचा मुख्य मालकाने प्रमाणित केलेला पुरावा मंडळास सादर करणे बंधनकारक राहील. (उदा. वेतनपत्रक, हजेरीपत्रक इत्यादी) अर्जदाराने पुराव्यादाखल सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी/सतासत्यता संबंधित क्षेत्रिय निरीक्षकाने केल्यानंतर सदर पुरावा सादर करणाऱ्या सुरक्षा रक्षकांना नोंदणीकरीतां शासनाच्या दि.२.३.२००९ रोजीच्या शासन आदेशातील वयाची अट लागू राहणार नाही. तसेच मंडळाच्या नोंदीत मुख्य मालकाने मंडळात नोंदणी घेतेवेळी त्यांचेकडे एजन्सीमार्फत कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांना मंडळात नोंदीत करुन त्यांचेकडेच वितरीत करण्याची शिफारस केल्यास अशा सुरक्षा रक्षकांची नोंदणी मंडळाने दि.२.३.२००९ रोजीच्या शासन आदेशानुसार करुन सदर सुरक्षा रक्षकांना त्याच नोंदीत मुख्य मालकाकडे विनाविलंब वितरीत करावे. तथापि, या सुरक्षा रक्षकांना शासनाच्या दि.२.३.२००९ रोजीच्या शासन आदेशातील वयाची अट लागू रहाणार

...३

नाही. तसेच सुरक्षा रक्षक मंडळांनी उपरोक्त नमुद पात्र उमेदवार/सुरक्षा रक्षकांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर शासनाची मान्यता घेऊन नंतरच त्यांची नोंदणी करावी आणि नोंदीत सुरक्षा रक्षकांची अंतिम यादी जाहीर करावी.

या शासन निर्णयाची अंमलबजावणी दि.२.३.२००९ रोजीच्या शासन आदेशान्वये करण्यांत यावी.

हा शासन निर्णय महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ८(४) अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
(बा.शि. वानखेडे)
**शासनाचे उप सचिव**

प्रत :-
१) मा. मंत्री (कामगार),
२) मा. राज्यमंत्री (कामगार),
३) कामगार आयुक्त, कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई
४) सह कामगार आयुक्त, कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई
५) अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक मंडळे, बृहन्मुंबई आणि ठाणे
६) निवड नस्ती (कामगार-५)